
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | बुधवार, 13 मे 2026 | अंक क्र. 350 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# माणुसकीचा अनोखा ग्लोबल पॅटर्न!

## परळीत 'अन्नछत्र' सेवेचा थाटात शुभारंभ; परळीत आता कुणीही उपाशी राहणार नाही!

■ परळी - अतुल्य महाराष्ट्र वृत्त

समाजातील कष्टकरी, शेतमजूर आणि गरजू नागरिकांसाठी परळी शहरात ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने मोफत अन्नछत्र सेवेचा शुभारंभ सोमवारी, ११ मे रोजी करण्यात आला. जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

परळी शहर हे बाजारपेठेचे मोठे केंद्र असल्याने दररोज ग्रामीण भागातून हजारो शेतकरी आणि कामगार कामानिमित्त येथे येतात. या कष्टकरी बांधवांना दुपारी किमान एक वेळचे सकस भोजन मिळावे, या हेतूने हे अन्नछत्र सुरू करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, १ मे रोजी सिरसाळा येथे सुरू झालेल्या अशाच केंद्रात दररोज जवळपास १०० हून अधिक लोक लाभ घेत आहेत, त्याचप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरातील संकटमोचन हनुमान मंदिरासमोर ही सेवा सुरू करण्यात आली असून, यामुळे शहरात येणाऱ्या हजारो गरजूंना मोठा आधार मिळाला आहे.

या उद्घाटन सोहळ्यास डॉ. हरिश्चंद्र वंगे, बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष माऊली फड, श्रीराम मुंडे, पाटलोबा मुंडे, नंदलाल बियाणी, पंचायत समितीचे माजी सभापती बालाजी उर्फ पिंटू मुंडे, माजी नायब तहसीलदार बी.एल. रुपनर, बाजार समितीचे सचिव बलवीर रामदासी यांच्यासह व्यापारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्लोबल विकास ट्रस्टच्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकीचा नवा आदर्श निर्माण झाला असून, 'भुकेल्याला अन्न' या संकल्पनेतून माणुसकीचा खरा धर्म जपला जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**जलनायक मयंक गांधी यांच्या कल्पनेतून परळीत सामाजिक बांधिलकीचे दर्शन. दररोज बाजार समिती परिसर, संकटमोचन हनुमान मंदिरासमोर मोफत भोजनाची सोय.**




**अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. समाजातील कोणताही व्यक्ती उपाशी झोपू नये, हाच आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे. : मयंक गांधी (जलनायक)**

## प्रथमेश आणि प्रांजली भावंडांचे यश!

### परळीत पत्रकार बांधवांच्या वतीने सत्कार संपन्न



■ परळी/ प्रतिनिधी

परळी येथील फुले आंबेडकरी अभ्यासक इंजि. भगवान साकसमुद्रे यांचे पुतणे तथा बालासाहेब साकसमुद्रे यांची मुले प्रथमेश आणि प्रांजली यांनी एसएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. प्रांजली हिला 94.80 तर प्रथमेश याला 94.20 गूण मिळाले आहेत. या त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे. याचाच भाग म्हणून आज परळी पत्रकार बांधवांच्या वतीने साकसमुद्रे भावंडांचा सत्कार पुण्यनगरी कार्यालय परळी येथे करण्यात आला यावेळी दैनिक पुण्य नगरीचे तालुका प्रतिनिधी तथा अ.भा. मराठी पत्रकार परिषदेचे धनंजय अरबुने, दैनिक अतुल्य महाराष्ट्रचे संपादक नितीन ढाकणे, लक्ष्मण वैराळ सर, माहिती अधिकार कार्यकर्ते सम्राट गित्ते, आम्रपाली साकसमुद्रे,साक्षी साकसमुद्रे दिसत आहेत.

## लातूर ग्रामीण मतदार संघातील एकोणीस देवस्थानांना

### आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून "क" दर्जा प्राप्त

■ लातूर प्रतिनिधी

लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रयत्नातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावातील एकोणीस देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकासाचा "क" दर्जा प्राप्त झाला आहे. क दर्जा प्राप्त झाल्याने त्या त्या गावातील देवस्थानाचा सर्वांगीन विकास होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध विकास कामांना मान्यता देण्यात आली आहे. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध गावच्या विविध देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकासाचा "क" दर्जा देऊन भाविक भक्तांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती.



आ. रमेशआप्पा कराड यांच्या मागणीनुसार लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान जवळा बु, श्री संत माधव मामा ज्ञानेश्वरी संस्थान मठ पानगाव, श्री विघ्नहर्ता दत्त मंदिर भाडगाव, श्री गुप्तलिंग महादेव मंदिर दगडवाडी, श्री मुकुट शहावली दर्गा मुशिराबाद, श्री खंडोबा मंदिर बिंदगीहाळ, श्री मनमत स्वामी देवस्थान भातांगळी, श्री लक्ष्मी मंदिर बोकणगाव, श्री महेबूब सुबानी दर्गा बोरी, श्री आत्मलिंगेश्वर महादेव मंदिर बोरी, श्रीकृष्ण मंदिर उमरगा, श्री खंडोबा मंदिर बामणी, श्री काशीविश्वेश्वर विठ्ठल रुक्मिणी मंदिर भडी, श्री खंडोबा मंदिर भातखेडा, श्री हनुमान मंदिर चिकलठाणा, श्री खंडोबा मंदिर भातांगळी, श्री विठ्ठल मंदिर ममदापूरपाटी, श्री नत्तरशहाबाबा दर्गा बोरी, श्री खंडोबा मंदिर ममदापूर अशा एकूण एकोणीस विविध देवस्थानचा शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेत समावेश करण्यात आला आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील तब्बल एकोणीस विविध देवस्थानांना तीर्थक्षेत्र विकास योजनेचा "क" दर्जा मिळवून दिल्याबद्दल भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे त्या त्या गावातील भाजपाच्या कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांनी आभार व्यक्त केले आहेत.





# अंबाजोगाईत मध्यरात्री भीषण अग्नितांडव; इलेक्ट्रॉनिक्स, फर्निचर दुकानासह कारखाना जळून खाक

■ अंबाजोगाई अशोक दळवे

शहरातील रिंगरोडवरील बँक कॉलनी परिसरात मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत लहू आणि अंकुश सुरवसे यांचा "विराट इलेक्ट्रॉनिक्स अँड भांडी फर्निचर" हा व्यवसाय पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. या आगीत दुकान, गोडाऊन तसेच फर्निचर तयार करण्याचा कारखाना जळून खाक झाला असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचे प्रयत्न सुरू केले. मध्यरात्री लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे मोठे लोट दूरवरूनही दिसत होते. स्थानिक नागरिकांनीही घटनास्थळी धाव घेत अग्निशमन दलाला सहकार्य केले.

सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असल्याने ग्राहकांच्या मागणीसाठी दुकानात नवीन इलेक्ट्रॉनिक वस्तू, भांडी आणि तयार फर्निचरचा मोठा साठा करण्यात आला होता. तसेच कारखान्यात विविध प्रकारचे फर्निचर तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू होते. मात्र, मध्यरात्री अचानक लागलेल्या आगीने काही क्षणांत सर्व साहित्य जळून खाक झाले. अनेक वर्षांच्या मेहनतीतून उभा केलेला व्यवसाय डोळ्यादेखत जळताना पाहून सुरवसे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, अधिकृत कारण अग्निशमन विभाग आणि संबंधित यंत्रणांच्या तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. प्रशासनाकडून पंचनामा आणि नुकसानीचा अंदाज घेण्याचे काम सुरू असून व्यापारी वर्गातून सुरवसे कुटुंबीयांना मदतीची मागणी होत आहे.

# संपादकीय

## ओल्या जखमेची वर्षपूर्ती

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगामच्या निसर्गरम्य 'बैसारन व्हॅली'त झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश सुन्न झाला होता. २६ निष्पाप पर्यटकांचा बळी घेणाऱ्या या घटनेने माणुसकीला काळिमा फासला, पण त्याच वेळी भारताच्या अदम्य धैर्याची आणि लष्करी सामर्थ्याची नवी ओळख जगाला करून दिली. 'पहलगाम' शब्द उच्चारला, तरी तो भीषण दहशतवादी हल्ला डोळ्यांसमोर येतो. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या हल्ल्याला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. काश्मीरच्या सौंदर्यांचे वर्णन करताना 'पृथ्वीवरील नंदनवन' हा शब्द नेहमीच वापरला जातो. मात्र, गेल्या वर्षी याच दिवशी नंदनवनातील पहलगामच्या निसर्गरम्य 'बैसारन व्हॅली'मध्ये रक्ताचे सडे पडले. हा दिवस केवळ त्या २६ निष्पाप जीवांच्या बलिदानाच्या स्मरणाचा नाही, तर दहशतवादाविरोधात भारत देश किती ठामपणे उभा आहे, याचं प्रत्यंतर दर्शवणारा आहे. बैसारन व्हॅलीमध्ये पर्यटक घोडेस्वारीचा आणि निसर्गाचा आनंद घेतात. त्यादिवशी दुपारी १ ते ३ च्या सुमारास अचानक ४ ते ७ सशस्त्र दहशतवादी जंगलातून बाहेर आले आणि त्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले बहुतांश पर्यटक होते. हल्ल्याच्या त्या भीषण क्षणांमध्ये केवळ मृत्यूचे तांडव नव्हते, तर माणुसकीची काही उदाहरणेही जगाला पाहायला मिळाली. आदिल हुसेन शाह नावाच्या एका स्थानिक खेचरस्वाराने पर्यटकांना वाचवण्यासाठी स्वतःचा जीव धोक्यात घातला. या हल्ल्यात महाराष्ट्रातील दिलीप देसले आणि अतुल मोने यांच्यासह देशाच्या विविध भागांतील पर्यटकांना आपले प्राण गमवावे लागले. आपल्या कुटुंबासह सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गेलेले भारतीय नौदलाचे अधिकारी लेफ्टनंट विनय नरवाल हेदेखील या हल्ल्याचे बळी ठरले. हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. पाकिस्तान पुरस्कृत 'द रेसिस्टन्स फ्रंट' या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने केवळ निषेध व्यक्त करून थांबायचे नाही, अशी ठाम भूमिका घेतली. दहशतवाद्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्यासाठी भारतीय सशस्त्र दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. ७ मे २०२५ रोजी भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाने संयुक्त कारवाई करत पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळांवर 'सर्जिकल स्ट्राईक' केला, ज्यात सुमारे १००हून अधिक दहशतवादी मारले गेले. जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबा यांसारख्या संघटनांची महत्त्वाची केंद्र उद्ध्वस्त करण्यात लष्कराला यश मिळाले. ही मोहीम केवळ २३ मिनिटांत यशस्वीपणे पूर्ण झाली, ज्यामध्ये 'राफेल' विमानांचा वापर करण्यात आला होता. त्याव्यतिरिक्त भारताने पहिल्यांदाच १९६० चा ऐतिहासिक सिंधू जल करार स्थगित करण्याचा मोठा निर्णय घेतला. जोपर्यंत पाकिस्तान सीमेपलीकडील दहशतवादाला पाठिंबा देणं थांबवत नाही, तोपर्यंत हा करार व्यवहारात राहणार नाही, अशी स्पष्ट भूमिका भारत सरकारने घेतली. पाकिस्तानशी व्यापार पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतल्याने आधीच आर्थिक संकटात असलेल्या पाकिस्तानचं कंबरडे मोडलं.

या हल्ल्यानंतर काश्मीरमधील पर्यटकांच्या सुरक्षेसाठी अनेक मोठे बदल करण्यात आले. क्यूआर कोड आणि डिजिटल ट्रॅकिंगची पद्धत अवलंबली गेली. पर्यटकांच्या प्रत्येक वाहनाला आणि घोडेस्वारांना विशेष क्यूआर कोड दिले जाऊ लागले. त्यामुळे कोणता पर्यटक कोणत्या भागात आहे, याची अचूक माहिती नियंत्रण कक्षाला मिळू लागली. पहलगाम आणि बैसारन व्हॅलीसारख्या दऱ्याखोऱ्यांतील घनदाट जंगलांच्या भागात २४ तास उच्च-गुणवत्तेच्या ड्रोनद्वारे गस्त घातली जात आहे. जंगलात कोणत्याही संशयास्पद हालचाली दिसल्यास तत्काळ अलर्ट दिला जातो. स्थानिक लोकांमध्ये सुरक्षेची भावना निर्माण करण्यासाठी गावकऱ्यांना संरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आलं आहे.

दहशतवाद्यांना स्थानिक स्तरावर कोणताही आधार मिळणं आता कठीण होत आहे. लष्कर आणि स्थानिक पोलीस यांच्यात समन्वय वाढवण्यासाठी विशेष 'क्विक रिस्पॉन्स टीम्स' तैनात करण्यात आल्या आहेत, ज्या ५ मिनिटांच्या आत कोणत्याही घटनास्थळी पोहोचू शकतात. काश्मीर खोऱ्यातील स्थानिक दहशतवाद्यांचा बिमोड करण्यासाठी लष्कर आणि पोलिसांनी संयुक्त 'ऑपरेशन महादेव' राबवलं. २८ जुलै २०२५ पर्यंत पहलगाम हल्ल्यात थेट सहभागी असलेल्या सुलमान उर्फ फैजल जट आणि हमजा अफगाणी यांसह सर्व प्रमुख दहशतवाद्यांचा खात्मा झाला आहे. पाकिस्तानी नागरिकांसाठी असलेली 'सार्क व्हिसा सवलत योजना' रद्द करण्यात आली असून पूर्वी दिलेले व्हिसाही अवैध ठरवण्यात आले आहेत. अटारी-वाघा सीमा बंद करण्याचा निर्णय घेतल्याने दोन्ही देशांमधील नागरिक आणि मालाची ये-जा थांबली आहे. आज एक वर्षानंतर पहलगाम पुन्हा पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज झालं आहे. काश्मीरमधील पर्यटनस्थळांवर क्यूआर कोड आधारित पडताळणी यंत्रणा आणि तंत्रज्ञानावर आधारित कडक निगराणी ठेवली जाते आहे. स्थानिकांच्या मनात अजूनही जखमा ओल्या असल्या तरी दहशतवादाला थारा न देण्याचा त्यांचा निर्धार अधिक पक्का झाला आहे. पहलगामचा हा हल्ला केवळ पर्यटकांवरचा हल्ला नव्हता, भारताच्या अखंडतेवर आणि शांततेवर केलेला आघात होता, अशी भारतीयांची भावना आहे. शहीद झालेल्या २६ जीवांना आदरांजली वाहताना आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे, की अशा भ्याड कृत्यांनी भारताचा विकास आणि काश्मीरची प्रगती यापुढेही थांबणार नाही. दहशतवादाचा नायनाट करण्यासाठी संपूर्ण देशाने एकजुटीने उभं राहायला हवं. या दुःखद घटनेतून सावरत असताना आपण त्या बलिदानाचं स्मरण ठेऊया आणि शांततापूर्ण व सुरक्षित भारताच्या निर्माणासाठी कटिबद्ध होऊया. पहेलगाम हल्ल्यातील शहिदांचे बलिदान व्यर्थ जाणार नाहीत. हा देश तुमच्या धैर्याचा आणि त्या भयाण दिवशी दाखवलेल्या माणुसकीचा सदैव ऋणी राहील. दहशतवादाचा अंत आणि शांततेचा सूर्योदय हाच देशवासीयांचा निश्चय आहे. त्या भ्याड हल्ल्यात प्राण गमावलेल्या निष्पाप जीवांना आणि वीर जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# शिवसेना जिल्हाप्रमुख पदासाठी धनंजय पापा सोळंके यांची निवड करावी : कैलास कावरे

धनंजय पापा सोळंके हे गेल्या वर्षांपासून शिवसेनेचे एकनिष्ठ शिलेदार आहेत शाखाप्रमुख पदापासून ते शिवसेनेच्या शहर प्रमुख पदापर्यंत अनेक पद सांभाळले असून माजलगाव नगर परिषदेचे शिवसेनेच्या धनुष्यबाणावर नगरसेवक सुद्धा ते झालेले आहेत पक्षाच्या प्रत्येक आंदोलनात, निवडणुकीत, शाखा बांधणीत आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांवर हे आघाडीवर राहिले आहेत. उदा: कोविड काळात केलेले काम, शेतकरी प्रश्न, स्थानिक समस्या सोडवण्यासाठी केलेली अनेक आंदोलनामध्ये हेराहेरीने सहभाग घेतलेला असून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षांच्या माध्यमातून अनेक रुग्णांना त्यांनी भरीव अशी मदत मिळवून दिली आहे अशा तरुण तडफदार शिवसेनेच्या कट्टर कार्यकर्त्याला जिल्हाप्रमुख पदावर बसून





काम करण्याची संधी द्यावी अशी मागणी परळी युवा सेनेचे विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी केली आहे पुढे निवेदनात म्हंटले आहे की सत्तेच्या काळातही आणि पक्षावर संकट आले तेव्हाही यांनी बाळासाहेबांचे विचार धर्मवीर आनंद दिघे साहेब व एकनाथ शिंदे साहेब खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृत्वावर निष्ठा ठेवून आहेत बीड


जिल्ह्याची गरज सध्याची स्थिती जिल्ह्यात पक्ष बांधणी थांबली आहे. जुने शिवसैनिक नाराज आहेत. बूथ लेव्हलपर्यंत पोचणारा चेहरा नाही धनंजय पापा सोळंके हा जमिनीवरचा कार्यकर्ता आहे. प्रत्येक तालुका, गाव येथे यांची ओळख आहे. युवकांना जोडण्याची ताकद आहे. सामान्य शिवसैनिक यांच्यात स्वतःचा नेता पाहतो परिणामी यांच्या निवडीने जिल्ह्यातील मरगळ झटकली जाईल. येणाऱ्या निवडणुकांमध्ये शिवसेनेची ताकद 10 पटीने वाढेल. हा निर्णय म्हणजे कट्टर शिवसैनिकांचा सन्मान असेल माननीय एकनाथजी शिंदे साहेबांनी, संसद रत्न खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे साहेब , व शिवसेना सचिव संजय मोरे साहेब यांनी जिल्ह्यातील हजारो शिवसैनिकांच्या भावनेचा आदर करून धनंजय पापा सोळंके यांची तात्काळ जिल्हाप्रमुख पदी निवड करावी कार्यकर्त्यांचा आवाज ही केवळ आमची मागणी नाही, तर तळागाळातील प्रत्येक निष्ठावंत शिवसैनिकाची इच्छा आहे. एकाच व्यक्तीला पाच वर्ष पदावर असूनही पक्ष संघटना न वाढविणाऱ्या पदाधिकाऱ्यांना घरचा रस्ता दाखववा जर निष्ठावंत कार्यकर्त्याला डावलले गेले तर जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये चुकीचा संदेश जाईल. आम्ही लोकशाही मार्गाने आमची मागणी लावून धरत आहोत असेही कैलास कावरे यांनी म्हटले आहे खुर्चीसाठी नाही, तर बाळासाहेबांच्या विचारांसाठी लढणारा कट्टर शिवसैनिक जिल्हाप्रमुख व्हावा अशी संबंध जिल्ह्यातील शिवसैनिकांची व अनेक पदाधिकाऱ्यांची एकमुखी मागणी आहे असे कैलास कारे यांनी प्रसिद्धी माध्यमात म्हटले आहे साहेब हा आपला परिवारातील घरचा विषय आहे, साहेब योग्य निर्णय घेतील शिवसैनिकांसहित पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी घेऊन शिवसेना पक्षांच्या वरिष्ठांना निवेदन देणार असल्याचेही या वेळी युवा सेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी प्रसिद्धी माध्यमांना कळवले आहे

# परळीत अवकाळीचा कहर: कासारवाडीत झाड कोसळून सौर ऊर्जेचे संच उद्ध्वस्त; शेतकरी संकटात

■ **परळी वैजनाथ (प्रतिनिधी):**

परळी तालुक्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. तालुक्यातील कासारवाडी येथील शेतकरी तुकाराम मुरलीधर गुट्टे यांच्या शेतातील विहिरीवर बसवलेली सौर ऊर्जा किट (Solar Kit) झाड कोसळल्यामुळे पूर्णपणे निकामी झाली आहे. १ मे रोजी घडलेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ मे रोजी परळी परिसरात सोसाट्याचा वारा आणि



### पंचनामा करून मदतीची मागणी:

■ **या घटनेमुळे सौर किटचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, संबंधित विभागाने तातडीने या घटनेचा पंचनामा करावा आणि नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी तुकाराम गुट्टे व परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.**

विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. यावेळी कासारवाडी शिवारातील तुकाराम गुट्टे यांच्या विहिरीवरील सौर ऊर्जेच्या पॅनेलवर शेजारील एक मोठे झाड उन्मळून पडले. झाडाचा भार इतका मोठा होता की, त्यामुळे सौर पॅनेलला मोठे तडे गेले असून संपूर्ण स्ट्रक्चर वाकले आहे.

उन्हाळ्याच्या दिवसात विहिरीला पाणी असताना, विजेअभावी सौर ऊर्जेच्या माध्यमातून पिकांना पाणी देणे सुलभ झाले होते. मात्र, आता ऐन हंगामात सौर किट फुटल्यामुळे सिंचनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी त्रस्त असताना, या घटनेने गुट्टे यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे.



# नंदागौळ येथे पुन्हा तीन ठिकाणी चोरी,दुचाकीसह रोकड घेऊन चोरटे पसार !

■ **परळी(प्रतिनिधी)**

परळी तालुक्यातील नंदागौळ येथे मागील 7 महिन्यात तिसऱ्यांदा चोरीची घटना घडली आहे तर या 45 दिवसात दुसऱ्यांदा चोरी झाली आहे मागील वेळी 3 तर यावेळी सोमवारी 11 मे 2026 रोजी रात्री 12 च्या सुमारास 3 ठिकाणी चोरी केली असून एका ठिकाणी मोटारसायकल नेताना घरातील व्यक्ती जागे झाल्याने चोर पसार झाले आहेत,रात्री चोरी होणार दुसऱ्या दिवशी सकाळी 8 - 9 वाजता येऊन पोलीस पाहणी व पंचनामा करणार आणि अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा दाखल होणार या पलीकडे पोलीस प्रशासनाकडून काहीही न झाल्याने,मागील 7 महिन्यातील चोरीचा तपास न लागल्याने चोरांची हिंमत वाढली आहे,त्यात पोलिस प्रशासनाचे बिट अंमलदार यांनी इतर कर्मचाऱ्यांना घेऊन त्यांच्या नियुक्ती पासुन एकदाही रात्रीची गस्त घातली नाही याचे आश्चर्य व्यक केले जात आहे,दरम्यान या चोरीच्या घटनेमुळे पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे तर गावातील नागरिक भयभीत झाले आहेत,पोलीस प्रशासनाला चोरांना शोधून जेरबंद करण्यात अपयश आल्याने वारंवार नंदागौळ या गावातच चोरीच्या घटना घडत आहेत,त्यामुळे मागील 7 महिन्यात झालेल्या सर्व चोरीच्या घटनेचा तपास पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेबांनी विशेष पथका मार्फत करून चोराना जेरबंद करण्याची मागणी नंदागौळचे सरपंच सुंदर गित्ते यांनी केली आहे.

- **45 दिवसात 6 घरामध्ये चोरी; पोलिसांचे अपयश तर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण !**
- **एवढया मोठ्या प्रमाणात चोरी होऊन पोलिसांकडून रात्रीची गस्त का घातली जात नाही ? नागरिकांचा सवाल !**
- **नंदागौळ येथे मागील 7 महिन्यात झालेल्या चोरीच्या घटनांचा तपास विशेष तपास पथका मार्फत करावा - सुंदर गित्ते**




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# शॉर्ट सर्किटमुळे केशर आंब्याची बाग जळून खाक आष्टी तालुक्यातील बीड सांगवी/गणगेवाडी येथील घटना; शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान

■ देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

आष्टी तालुक्यातील बीड सांगवी/गणगेवाडी येथे शेतकरी नामदेव लक्ष्मण मोहरकर यांच्या मालकीची सुमारे १ हेक्टर क्षेत्रातील केशर आंब्याची बाग रविवारी (दि. १० मे) दुपारी अचानक लागलेल्या भीषण आगीत पूर्णतः जळून खाक झाली. ऐन फळ काढणीच्या काळातच ही दुर्घटना घडल्याने शेतकऱ्यावर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मोहरकर यांच्या शेतातील केशर आंब्याची बाग यंदा भरघोस फळांनी बहरून गेली होती. काही दिवसांतच आंब्यांची काढणी होणार असल्याने शेतकरी आनंदात होता. मात्र दुपारच्या सुमारास अचानक शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. उन्हाची तीव्रता आणि वाऱ्याचा वेग जास्त असल्याने काही क्षणांतच आगीने संपूर्ण बागेला वेढा घातला.

आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी धाव घेत आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र भर उन्हात भडकलेल्या आगीसमोर त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. पाहता पाहता संपूर्ण आंब्याची बाग जळून खाक झाली.

या आगीत शेकडो आंब्याची झाडे, फळे तसेच सिंचनासाठीचे साहित्य जळून मोठे नुकसान झाले असून लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या घटनेमुळे मोहरकर कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून शासनाने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.a






# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान मोलाचे: मानसिंगराव नाईक

## उपक्रमशील शिक्षिका सौ.सीता चाळके यांचा सेवापूर्ती समारंभ

■ भाटवडे / प्रतिनिधी

विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये प्राथमिक शिक्षकांचे योगदान मोलाचे आहे. संस्कारक्षम पिढी घडवण्यासाठी समाजात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे. सक्षम समाज घडवण्यासाठी शिक्षकांनी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे आवाहन सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष मानसिंगराव नाईक यांनी केले.

वाळवा तालुक्यातील नेर्ले येथील शाळा नंबर ३ च्या उपक्रमशील शिक्षिका सौ. सीता आनंदा चाळके यांच्या सेवापूर्ती सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेच्या संचालिका सौ. अनिता काटे होत्या.

यावेळी शिराळा पंचायत समितीचे सभापती सम्राटसिंह नाईक, जिल्हा परिषद सदस्या सौ. राजेश्वरी रणधीर नाईक, युवा नेते रणधीर नाईक, गटशिक्षणाधिकारी सुनील आंबी, नेर्लेचे लोकनियुक्त सरपंच संजय पाटील प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी विठ्ठल रुक्मिणी प्रतिमेचे पूजन आणि कुंडीतील रोपाला जलदान करण्यात आले. यावेळी रणधीर नाईक म्हणाले, प्रतिकूल परिस्थितीत दळणवळणाच्या सुविधांचा अभाव असतानाच्या काळात प्राथमिक शिक्षकांनी ग्रामीण भागातील विद्यार्थी घडवण्यासाठी दिलेले योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. त्यांच्यामुळेच आज शिराळा सारख्या डोंगराळ आणि दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई सारख्या ठिकाणी रोजगाराच्या संधी मिळत आहेत. स्पर्धेच्या युगात टिकणारे विद्यार्थी घडवण्याचे प्रामाणिक काम प्राथमिक शिक्षकांनी केले आहे. यावेळी सौ.राजेश्वरी नाईक, सौ.अनिता काटे, सरपंच संजय पाटील, सौ. शैलजा पाटील, रामेश्वर शिंदे, शिक्षक नेते वसंत शिंगारे, रमेश पाटील, प्रा.सौ. शितल पाटील, आराध्या मुळीक यांची भाषणे झाली. नेर्ले केंद्राच्या वतीने सौ. सीता चाळके, आनंदा चाळके या उभयतांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक केंद्रप्रमुख पोपट जाधव यांनी केले. आभार आनंदा चाळके यांनी मानले. सूत्रसंचालन संजय सावंत यांनी केले. यावेळी शिक्षक नेते माणिकराव पाटील, उत्तम पाटील, जागर शिक्षणाचा प्रणेते दीपक रोकडे, घनश्याम पाटील, सरपंच भीमराव ताटे, उपसरपंच जयवंत पाटील, रमेश रोकडे, सदाशिव बल्लाळ, डॉ. तानाजी आणेकर, रघुनाथ आणेकर, उत्तम चाळके, रंजना रोकडे, प्रियांका मुळीक, राजश्री कांबळे, अनिल रोकडे आप्पासो आनेकर, शिरटे, नेर्ले, बांबवडे गावातील पदाधिकारी, पालक शिक्षक उपस्थित होते.

# सिरसाळा येथे गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचा कुशीनगर बुद्ध विहार येथे 10 वी 12 वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

■ सिरसाळा. अतुल बडे.

सिरसाळा येथे १० वी-१२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न सिरसाळा, दि. १० मे २०२६ : सम्राट अशोक बुद्ध विहार, सिरसाळा येथे १० वी व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांना धूप, दीप व पुष्प अर्पण करून महिला मंडळाच्या हस्ते अभिवादनाने करण्यात आली. यावेळी साक्षी मनोहर जगतकर, प्राची दिगंबर उजगरे, सायली सुरेश उजगरे, रत्नदीप दयानंद झिंजुर्डे, अनुश श्रावण किरवले व सुजल सिद्धार्थ गायकवाड या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, वही व पेन देऊन सत्कार करण्यात आला. गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना झिंजुर्डे सर म्हणाले की, “विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ज्ञान ग्रहण करावे, शीलवान बनावे आणि स्वतःचे जीवन घडवावे.” रामदादा किरवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, “विद्यार्थ्यांनी समाजमाध्यमांपासून दूर राहून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. मेहनतीला पर्याय नसतो. वारसाने ज्ञान मिळत नाही, ते स्वतः ग्रहण करावे लागते.” कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहेबराव किरवले सर यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व उपासकांची उपस्थिती होती.



# “बुद्ध विचारच जगाला वाचवू शकतो” : भंते धम्मसार जि. (वर्धा)

■ सिरसाळा.अतुल बडे.

सिरसाळा : येथील धम्मसभेत भंते धम्मसार यांनी बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी “धम्मसवणकालो अयं भदन्ता” हा पारंपरिक उच्चार त्रिवार करण्यात आला. “हे भन्ते, आता धम्म ऐकण्याची वेळ झाली आहे,” असा अर्थ स्पष्ट करत धम्मश्रवण शांतचित्ताने, एकाग्रतेने व आदरपूर्वक करावे, असे आवाहन करण्यात आले.

मार्गदर्शन करताना भंते धम्मसार म्हणाले की, “बुद्ध विचारच जगाला वाचवू शकतो. आज संपूर्ण जग बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहे.” त्यांनी सुदत्त (अनाथपिंडक) यांचा प्रसंग सांगत तथागत बुद्धांनी दिलेला “जगण्यात, विचारात आणि वागण्यात अभिलाषा येऊ देऊ नका,” हा संदेश स्पष्ट केला. तथागत बुद्धांनी ४५ वर्षे धम्मकार्य केले असून त्यातील २५ वर्षे श्रावस्ती येथे व्यतीत केली. कारण तेथील लोकांमध्ये अभिलाषा नव्हती, असे त्यांनी सांगितले. “संकल्पहीन मनुष्य पशूसमान असतो,” असे सांगत त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संदर्भ दिला. शिरसाळा येथे धम्माचे विद्यापीठ निर्माण होण्यासाठी पोषक वातावरण असल्याचे सांगत भंते धम्मसार म्हणाले की, “येथून समाजाची बौद्धिक गरज पूर्ण होऊ शकते. भिक्खू व उपासकांना योग्य मार्गदर्शन मिळू शकते. मी अकॅडमिक कार्याला महत्त्व देतो. विहाराचा मठ होऊ नये. बुद्धांना बाबासाहेबांशिवाय समजणे शक्य नाही.” यावेळी रामदादा किरवले यांनी “खरा संघ काय असतो हे भंतेंनी समाजाला दाखवून दिले पाहिजे. बाबासाहेबांना अपेक्षित असलेले धम्मकार्य झाले पाहिजे,” असे मत व्यक्त केले. प्रमोद किरवले. यावेळी केंद्रीय शिक्षक दशरथ गायकवाड हे उपस्थित होते.यांनी “धम्म कार्यात भंतेंना पूर्ण स्वातंत्र्य असावे,” असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष (जिजा) चोपडे यांनी केले.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, बुधवार, 13 मे 2026



# भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश कराड यांनी सर्वसमावेशक जिल्हा कार्यकारणी जाहीर केली

**लातूर | प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे जिल्ह्यातील मान्यवर नेत्यांच्या मार्गदर्शनानुसार भारतीय जनता युवा मोर्चा लातूर ग्रामीण जिल्हा सर्व समावेशक कार्यकारणी नुकतीच भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी जाहीर केली असून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले, भाजपाचे जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, माजी पालकमंत्री आ. संभाजीराव निलंगेकर, आ. रमेशआप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार यांच्यासह जिल्ह्यातील सर्व मान्यवर नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या सल्ल्यानुसार भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर जिल्हा ग्रामीण भाजयुमोची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून त्यात सरचिटणीसपदी संजय ठाकूर पाटील लातूर, रामानंद मुंडे अहमदपूर, प्रकाश पाटील निलंगा, सचिन अनसरवाडे औसा, रामेश्वर कलबुर्गे उदगीर यांचा समावेश करण्यात आला आहे.

भाजयुमोच्या जिल्हा कार्यकारणीत सोशल मीडिया प्रमुख महेश गाडे, युवती प्रमुख कु. श्रद्धा अरुण हसुरे यांची नियुक्ती करण्यात आली असून कोषाध्यक्षपदी मुकुंद केसरे यांची तर उपाध्यक्ष तम्मा माडीबोणे, सदानंद पाटील, गणेश मोहिते, संगम पताळे, अमित कारभारी, शरद पांचाळ, रामेश्वर चावरे, विकास पाटील, रमेश पाटील, भागवत गुट्टे, वामन मुळे, ओम प्रकाश कराड यांची तर सचिव पदी महेश मसलगे, ज्योतीराम बिराजदार, अमर मडजे, साधुराम कांबळे, दत्ता बलुरे, अजय मुलमवाड, साईनाथ धनुरे, रवी माकूडे, अक्षय भोसले, शिवम बुके, विशाल माळी यांच्यासह कार्यकारणी सदस्यात समाधान जागजे, प्रशांत बिडवे, मेघराज जाधव, उद्धव जाधव, रोकडोबा भुसाळे, विनायक गुणारे, अभिजीत तिडोळे यांच्यासह अनेकांचा समावेश करण्यात आला आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या असून भाजयुमो जिल्हा कार्यकारिणीचे सर्वस्तरातून स्वागत होत आहे.

## ना.पंकजाताई मुंडे यांनी सरस्वती नदी काँक्रीटीकरणा पासून वाचवल्याबद्दल आभार : अश्विन मोगरकर

**परळी वैजनाथ:** शहराच्या मध्यभागातून वाहणाऱ्या सरस्वती नदीपात्राचे खोलीकरण करताना त्या ठिकाणी सिमेंट काँक्रिटीकरण करू नये, अशा स्पष्ट सूचना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्षा व नगरपरिषद प्रशासनाला दिल्या आहेत. या निर्णयामुळे गाव भागातील जलस्त्रोत सुरक्षित राहण्यास मदत होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. परळीकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर त्वरित कार्यवाही केल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांचे हजारों परळीकरांच्या वतीने अश्विन मोगरकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.





गावभागातून वाहणाऱ्या सरस्वती नदी साठी शासनाने आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र, नदीपात्राच्या तळाशी काँक्रिटीकरण केल्यास पावसाचे पाणी जमिनीत मुरणार नाही, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली होती. नदीपात्रातून पाणी झिरपल्यामुळेच गाव भागातील आड आणि बोअरची पाणी पातळी टिकून राहते. जर काँक्रिटीकरण झाले, तर भविष्यात पाणीटंचाईचे मोठे संकट उभे राहील, असे गाऱ्हाणे नागरिकांनी पंकजाताई मुंडे यांच्याकडे मांडले होते.

सरस्वती नदीचे धार्मिक महत्व पौराणिक काळापासून सांगितले जाते. पूर्वी बारामही वाहणारी नदी अजूनही वर्षात सात-आठ महिने वहात आहे. काळानुरूप अनेक अतिक्रमणे नदीत वाढल्याने नदीचे पात्र अरुंद झाले आहे. परळी नगरपरिषदेने यात नदीला नाला दाखवत शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याचा प्रयत्न केला मात्र जागरूक नागरिकांनी यास विरोध करीत शॉपिंग कॉम्प्लेक्स चे काम बंद पाडले होते. आता शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत नदीचे काँक्रीटीकरण करण्याचा घाट घालण्यात आला. याविरोधात परळीकरांनी ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडे तक्रारी करून काम सुरू होऊ नये यासाठी निवेदने देण्यात आली. ना. पंकजाताई मुंडे यांनी या महत्त्वाच्या प्रश्नाकडे त्वरित लक्ष देऊन परळी गावभागाचे वाळवंट होण्यापासून रोखले. परळी वरचं आपलं लक्ष व काळजी यातून दिसते. परळीत होऊ पाहणाऱ्या घातक प्रकल्पाबाबत संवेदनशीलता दाखवत नागरिकांच्या या मागणीची तातडीने दखल घेत, ना. पंकजाताई मुंडे यांनी नगराध्यक्षा व पालिका प्रशासनाला पर्यावरण आणि जलस्त्रोतांचा विचार करून काँक्रिटीकरण न करण्याची सूचना केली.

लोकभावनेचा आदर करत घेतलेल्या या निर्णयाबद्दल परळीकरांच्या वतीने अश्विन मोगरकर यांनी ना. पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

## आंतरभारती दिन उत्साहात साजरा

**आंबाजोगाई :** आंतरभारती शाखा आंबाजोगाईच्या वतीने दिनांक १० मे २०२६ रोजी आंतरभारती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त "आंतरभारतीतील माझा प्रवास" या विषयावर उपस्थित मान्यवर व सदस्यांनी मनोगते व्यक्त केली.



कार्यक्रम सायंकाळी ६ ते ७ या वेळेत प्रा. संतोष मोहिते सरांचे कॉम्प्युटर वर्ल्ड, जयवंती नगर, आंबाजोगाई येथे पार पडला. आंतरभारती दिन का साजरा केला जातोआंतरभारती दिन हा भारतातील विविध भाषा, संस्कृती आणि प्रांतांमध्ये बंधुभाव व राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. मराठी साहित्यिक साने गुरुजी यांनी "आंतरभारती" ही संकल्पना मांडली होती. त्यांच्या मते, भारतातील प्रत्येकाने इतर भारतीय भाषा, संस्कृती आणि परंपरांचा आदर करून परस्परांमध्ये प्रेम व समज वाढवली पाहिजे. "भाषा वेगळी असली तरी भावना एकच आहे" हा संदेश आंतरभारतीच्या माध्यमातून दिला जातो.या दिवसानिमित्त विविध ठिकाणी भाषण व चर्चासत्रे, कविता, गीत व साहित्य वाचन, विविध भारतीय भाषांचा परिचय,सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय एकात्मतेवर मनोगते, असे उपक्रम आयोजित केले जातात. आंतरभारती दिन साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे "विविधतेत एकता" ही भारतीय संस्कृती अधिक दृढ करणे हा आहे.

अंबाजोगाईत आंतरभारती दिनाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. शैलजा बरुरे या होत्या, तर कार्यक्रमाचे आयोजन आंतरभारती शाखेचे सचिव प्रा. संतोष मोहिते यांनी केले. साहित्य, भाषा, संस्कृती आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांनी आंतरभारतीच्या कार्याचा गौरव करत आपले अनुभव मांडले.

## 'हा प्रामाणिक विद्यार्थ्यांचा नाही तर देशाच्या भविष्याचा पराभव आहे': डॉ राजेश इंगोले

### नीट 2026 परीक्षा रद्द : लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा, परीक्षा पद्धतीत मूलभूत बदलांची मागणी

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

नीट 2026 परीक्षा रद्द होणे हा केवळ एका परीक्षेपुरता विषय नाही, तर देशातील लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या विश्वासाला बसलेला मोठा धक्का आहे, अशी भावना सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले यांनी व्यक्त केली आहे.



यावर्षी देशभरातून तब्बल 22.7 लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नीट परीक्षा दिली. 5400 पेक्षा अधिक परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडली. महाराष्ट्र हा नीटसाठी सर्वाधिक विद्यार्थी देणाऱ्या राज्यांपैकी एक आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान आणि बिहार या चार राज्यांमधूनच देशातील 41% पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षेला बसतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचे भविष्य एका केंद्रीकृत यंत्रणेवर अवलंबून असणे हीच चिंतेची बाब ठरत आहे.

यावेळी डॉ इंगोले यांनी सरकारी भोंगळ कारभारामुळे शासकीय व्यवस्थेचे अक्षरशः धिंडवडे निघाले आहेत असे मत व्यक्त केले.

प्रत्येक विद्यार्थ्याच्या यशामागे वर्षानुवर्षांची मेहनत आहे. अनेकांनी मोबाईल, मनोरंजन, सण, मित्र आणि सामाजिक आयुष्य बाजूला ठेवून फक्त अभ्यासावर लक्ष केंद्रित केले. पालकांनी कर्ज काढले, शेती विकली, बचत खर्च केली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहरात येऊन संघर्ष केला. डॉक्टर होण्याचे स्वप्न हे फक्त करिअर नसून अनेक कुटुंबांच्या आशा आणि आयुष्याशी जोडलेले आहे.

अशा परिस्थितीत परीक्षा प्रक्रियेत गैरप्रकार, पेपर लीक किंवा सुरक्षेतील त्रुटी समोर येतात तेव्हा केवळ परीक्षा रद्द होत नाही, तर गुणवत्तेवरचा विश्वास हादरतो. प्रामाणिक विद्यार्थ्यांना अन्याय सहन करावा लागतो. मानसिक ताण, नैराश्य आणि असुरक्षिततेची भावना वाढते. यां प्रकारामुळे जर विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या तर याला कोण जबाबदार राहतील असा संतप्त सवाल डॉ इंगोले यांनी यावेळी केला.

यावेळी डॉ इंगोले यांनी 2024 मध्येही असाच प्रकार घडला होता तरीही शासकीय यंत्रणा सावध नव्हत्या ही दुर्दैवी बाब आहे.

यावर अधिक भाष्य करताना डॉ इंगोले यांनी 22 लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांसाठी एकाच दिवशी, एकाच पद्धतीने, अत्यंत केंद्रीकृत स्वरूपात परीक्षा घेण्याची सध्याची प्रणाली अधिक जोखमीची ठरत आहे. आता विकेंद्रीकरणाचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय गुणवत्ता निकष कायम ठेवून राज्यनिहाय किंवा विभागनिहाय परीक्षा मॉडेल विकसित करणे ही काळाची गरज बनली आहे असे डॉ इंगोले यांनी मत मांडले.

पुढे डॉ इंगोले यांनी "विद्यार्थ्यांना स्पर्धा मान्य आहे. कठोर परिश्रम मान्य आहेत. परंतु व्यवस्थेतील त्रुटींमुळे होणारा हा अन्याय मान्य असू शकत नाही," अशी स्पष्ट भूमिका मांडली.

देशाच्या आरोग्य व्यवस्थेचे भविष्य आजच्या विद्यार्थ्यांच्या हातात आहे. त्यांचा आत्मविश्वास आणि प्रामाणिकपणा जपणे ही शासन आणि परीक्षा यंत्रणांची सर्वोच्च जबाबदारी आहे.

केंद्र शासन आणि एन टी ए यांनी पुनर्परीक्षेची तारीख तातडीने जाहीर करावी. आगामी परीक्षा पूर्ण पारदर्शकता, अभेद्य सुरक्षा आणि शून्य गैरप्रकार या तत्त्वांवर पार पाडली गेली पाहिजे. कारण प्रामाणिक विद्यार्थ्यांचा पराभव झाला, तर देशाच्या भविष्याचाच पराभव होईल असेही डॉ इंगोले यांनी यावेळी सांगितले.

## परळीतील गर्भातील बाळ मृत्यू प्रकरणाची चौकशी सुरू

### जिल्हा शल्य चिकित्सकांची समिती परळीत दाखल

**परळी | प्रतिनिधी**

परळी येथे डॉक्टरांच्या कथित निष्काळजीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केल्यानंतर या प्रकरणाची गंभीर दखल घेण्यात आली आहे. जिल्हा शल्य चिकित्सकांनी यासंदर्भात चार सदस्यीय चौकशी समितीची स्थापना केली असून ही समिती आज परळीत दाखल झाली.

समितीच्या सदस्यांनी परळीतील गित्ते हॉस्पिटलला भेट देत संबंधित घटनेची प्राथमिक माहिती घेतली. तसेच हॉस्पिटल प्रशासन, संबंधित डॉक्टर व उपलब्ध वैद्यकीय कागदपत्रांची तपासणी करून संपूर्ण घटनेची सखोल चौकशी केली जाणार आहे.

या चौकशीनंतर समिती आपला सविस्तर अहवाल जिल्हा शल्य चिकित्सकांकडे सादर करणार आहे. अहवालाच्या आधारे संबंधित डॉक्टरांवर कारवाई करायची की नाही, याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परळी शहरात मोठी खळबळ उडाली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी कुटुंबीयांसह नागरिकांकडून केली जात आहे. समितीच्या अहवालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



